# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०८/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक १९/०८/२०२४ रोजी फिर्यादी (जख्मी) नामे— सिद्रासिंग खुमाणसिंग झाला वय ३५ वर्ष रा. किडाळा जि. गांधीधाम राज्य गुजरात ह. मु. गो गॅस कंपनी कुंभारी ता उमरेड व **आरोपी नामे— गोंविदा कुमार महतो, रा भागड, ता. उमरेड** हे गो गॅस कंपनी कुंभारी ता. उमरेड येथे फिटरचे काम करत असुन त्याच कंपनीच्या क्वार्टरमध्ये काम करणा—या मुलांसोबत आजुबाजुच्या क्वार्टरमध्ये राहतात. सदर कंपनी मध्ये सकाळी ०८/०० वा. पासुन ते रात्री ०८/०० वा. पर्यंत सोबत काम करतात. दोघांचे कंपनीमध्ये काम करण्याचे टुल बॉक्स वेगवेगळे असुन दि. १९/०८/२०२४ चे सायं ०५/०० वा. दर. यातील आरोपी याने नट टाईट करणे करीता फिर्यादीस पाना मागीतला असता यातील फिर्यादीने आरोपीस पाना देण्यास नकार दिल्याने आरोपीने तिथे शिवीगाळ व वादविवाद करून पाहुण घेण्याची धमकी दिली होती. त्यांचा ठेकेदार उदित तोमर याने भांडण सोडविले नंतर रात्री ०९/०० वा. दरम्याण फिर्यादी हा क्वार्टर मध्ये पलंगवर आराम करीत असतांना यातील आरोपी हा आला व अचानक दोन्ही पायावर व उजव्या हातावर लोखंडी रॉडने मारून जख्मी केले व फिर्यादी हा रूमच्या बाहेर जात असतांना त्याच रॉडने डोक्यावर मागील बाजुस मारून जख्मी केले. यातील आरोपीस उमरेड पोलीसांनी अटक केली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे उमरेड येथील ठाणेदार पोनि अनिल राउत, पोउपनि डोर्लीकर, सफौ धवड, पोअं तुषार, प्रकाश यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर